# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 03 January 2025

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०३ जानेवारी २०२५ दुपारी १.०० वा.

****

स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या स्मृतींना आज सर्वत्र अभिवादन करण्यात येत आहे. या निमित्तानं शैक्षणिक संस्थांसह विविध सामाजिक संस्था-संघटनांच्या वतीनं आदरांजलीपर विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सावित्रीबाई फुले यांना अभिवादन केलं आहे. सावित्रीबाई महिला सक्षमीकरणाच्या जननी असून, शैक्षणिक आणि सामाजिक सुधारणा क्षेत्रातल्या अग्रणी आहेत. लोकांसाठी जीवनाचा दर्जा उत्तम ठेवण्यासाठी काम करताना सावित्रीबाईंचं कार्य सतत प्रेरणा देत असल्याचं, पंतप्रधानांनी सामाजिक माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांचं जन्मगाव सातारा जिल्ह्यातल्या नायगाव इथं सावित्रीबाई जयंती सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं. यावेळी मंत्री अतुल सावे, पंकजा मुंडे, अदिती तटकरे आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर इथं औरंगपुरा परिसरात सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यासाठी सकाळपासूनच विविध पक्ष संघटनांचे पदाधिकारी तसंच नागरिकांची गर्दी दिसून येत आहे.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्ली इथं विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करणार आहेत. यामध्ये अशोक विहार इथं झोपडपट्टीतल्या रहिवाशांसाठी बांधलेल्या सुमारे सतराशे सदनिकांचं उद्घाटन, दोन नगर पुनर्विकास योजना, द्वारका

इथं केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या एकीकृत कार्यालय परिसराचं उद्घाटन, दिल्ली विद्यापीठात तीन नवीन योजनांचा शुभारंभ आदी कार्यक्रमांचा समावेश आहे.

****

परकीय गुंतवणुकीत महाराष्ट्र अग्रेसर असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. सामाजिक माध्यमावरच्या संदेशात त्यांनी गेल्या पाच वर्षातली परकीय गुंतवणुकीची आकडेवारी प्रसिद्ध केली. चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते सप्टेंबर या सहा महिन्याच्या काळात राज्यात एक लाख १३ हजार २३६ कोटी रुपयांची गुंतवणूक झाल्याचं त्यांनी सांगितलं. गेल्या चार वर्षांत सरासरी एक लाख १९ हजार ५५६ कोटी रुपये वार्षिक गुंतवणूक महाराष्ट्रात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण वर्षभराच्या ९४ पूर्णांक ७१ टक्के गुंतवणूक ही फक्त सहा महिन्यात आली असल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

****

राज्यातल्या वाळू माफियांना आळा घालण्यासाठी आणि गौण खनिजांच्या नियमनात अधिक कार्यक्षमतेसाठी महसूल विभागाने मोठा निर्णय घेतला आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नेतृत्वाखालील विभागाने आता गौण खनिजासंबंधीचे सर्व अधिकार थेट जिल्हाधिकाऱ्यांना प्रदान करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे वाळू तस्करांवर कठोर कारवाई करता येईल, तसंच निसर्गाचा समतोल राखला जाईल, असं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. हा निर्णय तातडीने लागू करण्यात येणार आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या माळेगाव यात्रेत कालपासून शासकीय कार्यक्रमाला सुरुवात झाली. यात पशु प्रदर्शन आणि स्पर्धा तसंच कृषी प्रदर्शनासह विविध कार्यक्रमांचा समावेश आहे, परवा पाच तारखेपर्यंत या यात्रेत लोककला महोत्सव, आरोग्य शिबिर, बैलगाडा शर्यत, दुग्ध स्पर्धा, कुस्त्यांची दंगल यासारखे कार्यक्रम होणार आहे.

****

परभणी इथं नगर विकास विभागाच्या जिल्हा क्रीडा आणि सांस्कृतिक महोत्सवाचं काल उद्घाटन झालं. प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुलावर जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या अध्यक्षतेखाली परभणी महापालिकेचे आयुक्त धैर्यशील जाधव यांनी या महोत्सवाचं उद्घाटन केलं. अनेक अधिकारी कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

****

मुंबई – गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यात आज पहाटे झालेल्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाला, तर तीन जण गंभीर जखमी झाले. मुंबईकडे जाणारी स्कॉर्पिओ गाडी रस्त्याच्या कडेला उभी असताना पाठीमागून आलेल्या टोईंग गाडीने कारला धडक देऊन हा अपघात झाला. मृत सर्वजण महाडचे रहिवासी असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

नांदेड रेल्वे विभागातल्या रांजणी आणि कोडी दरम्यान आजपासून नऊ तारखेपर्यंत चार तासांचा लाईन ब्लॉक घेण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर धर्माबाद–मनमाड मराठवाडा एक्सप्रेस धर्माबाद ते नांदेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली असून, काही रेल्वे गाड्या उशिरा धावणार आहेत. दक्षिण मध्य रेल्वेच्या विभागीय कार्यालयाकडून ही माहिती देण्यात आली.

****

दरम्यान, उत्तरेकडील भागात दाट धुक्यामुळे दृश्यमानता कमी झाल्याने दिल्लीहून जाणाऱ्या २४ गाड्या पाच तास उशिराने धावणार आहेत. यामध्ये गोरखधाम एक्सप्रेस, फरक्का, कालिंदी, महाबोधी, मालवा, अयोध्या एक्सप्रेस यांचा समावेश आहे.

****

सिडनी इथं सुरु असलेल्या बॉर्डर गावस्कर मालिकेतल्या पाचव्या आणि अंतिम कसोटी क्रिकेट मध्ये आज पहिल्या दिवसअखेर यजमान संघानं एक बाद नऊ धावा केल्या असून, हा संघ १७६ धावांनी पिछाडीवर आहे. दरम्यान, या कसोटीत भारताने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला, पण संघाची कामगिरी निराशाजनक झाली. भारताचा पहिला डाव १८५ धावांवर संपुष्टात आला. ऋषभ पंतने सर्वाधिक ४० धावा केल्या. रविंद्र जडेजानं २६, जसप्रित बुमराहनं २२, तर शुभमन गीलने २० धावा केल्या आहेत.

****